# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

(नोटीस)

नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २०/०८/**२०२०** रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातुन मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे सभा** आयोजित करण्यात येत आहे.

उपरोक्त **सभेच्या ४५ मिनीट आधी सभेची लिंक** ई-गव्हर्नंन्स कार्यालयाकडून प्राप्त झाल्या नंतर मा. पदाधिकारी/अधिकारी/सदस्य वर्गांना व्हॉस् अॅप गृप वर, व अधिकारी वर्गांना एच.ओ.डी. गृप वर कळविण्यांत येईल

## Webex व्दारे होणाऱ्या Video Conferencing's सुरळीत करण्यासाठी सूचना

Video Conference ने सभेत सहभागी होणाऱ्या मा. पदाधिकारी/अधिकारी/सदस्य वर्गांनी खालील सूचनांचे पालन केल्यास सभा सुरळीत रित्या संपन्न होण्यास मदत होईल.

१. कृपया Cisco Webex Meettings हा अॅप Play Store/App Store वरुन Download करुन अॅपमध्ये रजिस्टर्ड झाले आहे याची खात्री करावी.
२. कृपया सभेच्या वेळेच्या २० मिनीट अगोदर आपली उपस्थिती दर्ज करावी.
३. कृपया सभा चालू झाल्या पासून सभा संपे पर्यंत सर्वांनी जागेवर बसून सभेच्या लिंक वर उपलब्ध राहावे.
४. कृपया सभा चालू असतांना काही कारणास्तव सभेच्या लिंक बाहेर गेले असल्यास आपले निम्न दर्जाचे अधिकारी/कर्मचारी वर्गास अंपॉईंटिग करुन सभेच्या कामकाजा विषयी समजून घेण्यास भाग पाडावे, व मा. महापौर महोदयांनी विचारलेल्या प्रश्नांची निट माहिती दयावी .
५. कृपया बोलत नसताना स्वतला : Webex च्या अॅप मध्ये नि:शब्द Mute करावे.
६. कृपया Headphone चा वापर करावा.
७. कृपया Mobile Internet सुरळीत पणे सुरु आहे याची खात्री करून घ्यावी.
८. कृपया मोबाइल लॅपटॉप / टॅब / ची Battery कमीत कमी ६० % असावी.
९. कृपया आपला मोबाईल/टॅब/लॅपटॉप योग्य प्रकारे कार्य करीत असल्याची खात्री करावी .
१०. कृपया वेळेवर उपस्थित रहावे.
११. कृपया कॅमेरा योग्यरित्या फ्रेम करावा.
१२. कृपया कॅमेऱ्यामध्ये पहावे.
१३. कृपया व्यवस्थिपणे लक्ष द्यावे.

नागपूर
दिनांक :- १२/०८/२०२०

आदेशान्वये

हस्ता/-

(एस.एम. जयदेव)
निगम सचिव (प्र)
महानगरपालिका, नागपूर

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेले प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे. (दि.२०-०३-२०२० रोजी करीताचे प्रश्न)

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्न |
|---|---|---|---|
| 1. | १९८ | श्री. कमलेश दिलीप चौधरी | नागपूर महानगरपालिके अंतर्गत वाहन, भ्रमणध्वनी, लॅपटॉप व हॅन्डीकॅम (व्हिडीओ कॅमेरे) यांची सुविधा कोण-कोणत्या पदाधिकारी, अधिकारी/पूर्व अधिकारी पुरविण्यात आलेला आहे? या संदर्भात प्रश्न |
| 2. | १९९ | ॲड धर्मपाल मेश्राम | सन २०१९-२० हया आर्थिक वर्षातील कार्यादेश निर्गमित करण्यात आलेल्या विविध विकास कामांना स्थगिती देण्यात आली हे खरे आहे काय? या संदर्भात प्रश्न |
| 3. | २०० | ॲड धर्मपाल मेश्राम | मनपातील परिवहन विभागांतर्गत किती कंपन्यांना विविध कार्यासाठी अनुबंधित करण्यात आलेले आहे. या संदर्भात प्रश्न |
| 4. | २०१ | नितीन रामभाऊ साठवणे | नागपूर महानगरपालिकेत पदनाम (कॅडर) बदलविण्याचे प्रावधान आहे का? या संदर्भात |
| 5. | २०२ | सौ. आभा विजयकुमार पांडे | नागपूर शहरात मनपा हद्दीत एका व्यक्ती व्दारे किंवा एकाच संस्थे अथवा संघटने व्दारे नवीन इमारतीचे बांधकामबाबत संदर्भात प्रश्न |
| 6. | २०३ | श्री. प्रवीण प्रभाकर दटके | ऐवजदार सफाई कागमारांचे मूळ ऐवजदार कार्ड हरवले संदर्भात प्रश्न |
| 7. | २०४ | श्री . तानाजी सुकलाजी वनवे | महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत मौजा वाठोडा ख.क्र. १४४ येथे कंम्पोस्ट डेपा आरक्षणापासुन नियमात बफर झोन अंतराचा उल्लेख नसल्या संदर्भात प्रश्न |
| 8. | २०५ | श्री. रमेश गणपती पुणेकर | नागपूर महानगरपालिकेकडुन शहरातील कचरा संकलन संदर्भात प्रश्न |
| 9. | २०६ | सौ. परिणिता फूके | त्यांनी महानगरपालिकेच्या शाळेमधील जुना रेकॉर्ड डिजिटलायझेशन संदर्भात प्रश्न |
| 10. | २०७ | श्री. राजकुमार पुनाराम साहु | टॅक्स सर्वे करण्याकरिता अनंत टेक्नॉलॉजी व सायबर टेक या दोन्ही कंपनीचा कार्यकाल कुठपर्यंत आहे या संदर्भात प्रश्न |
| 11. | २०८ | श्री. प्रवीण प्रभाकर दटके | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३८ मध्ये आयुक्ताला अनुपस्थिती रजा देण्या संदर्भात प्रश्न |
| 12. | २०९ | श्री. प्रदीप वसंतराव पोहाणे | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५७ मध्ये रजा देण्या संदर्भात प्रश्न |
| 13. | २१० | श्री. सुनील दुलीचंद हिरणवार | नागपूर महानगरपालिके व्दारे जे ६ डीपी रोड सुरु केले संदर्भात प्रश्न |
| 14. | २११ | श्री. प्रमोद छत्रपाल चिखले | आयुक्त, अप्पर आयुक्त, उपायुक्त यांच्या माताहात काम करीत असलेले ओ.एस.डी. किंवा स्वीय सहाय्यक किंवा इतर पदावरील काम करीत असणारे संदर्भात |
| 15. | २१२ | सौ. कांता राधेश्याम लारोकर | मोमीनपुरा बकरा मंडी ही मनपाच्या जागेवर असून हया बकरा मंडीमुळे मनपाला कोणत्या प्रकारचे उत्पन्न होते? या संदर्भात प्रश्न |
| 16. | २१३ | श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे | नागपूर मनपाला कायद्याप्रमाणे देय असलेले विविध वैधानिक देणी किती प्रलंबित आहेत व कोणकोणत्या विभागांतर्गत आहेत. त्यांची वर्षनिहाय व रक्कमनिहाय माहिती देण्या संदर्भात |

(दि.२०-०६-२०२० रोजी करीताचे प्रश्न)

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्न |
|---|---|---|---|
| 1. | २१४ | श्री. प्रफुल गुडधे, | शहरातील घरोघरी कचरा उचलण्याचे काम AG Enviro व BVG या कंपन्या मार्फत करण्यांत येते या कंपन्यामध्ये कर्मचा-यांना लॉगडावून कालावधीत कमी करण्यांत आले त्या संदर्भात प्रश्न |
| 2. | २१५ | श्री. विरेन्द्र कुकरेजा | शहरातील एल.ई.डी. लाईट बाबत माहिती संदर्भात प्रश्न. |

(दि.२०-०८-२०२० रोजी करीताचे चे नविन प्रश्न)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | २१६ | श्री. जितेंद्र (बंटी) कुकडे | सातरोग अधिनियम लक्षाम घेता संपूर्ण जगामध्ये कोरोना महामारी संसर्ग या संदर्भात माहिती |
| 2. | २१७ | श्री. राजेंद्र विठ्ठलराव सोनकुसरे | नागपूर शहरातील मनपाच्या शाळा मोक्याच्या आणि विस्तीर्ण जागेवर दुरावस्थेत आहेत. या संदर्भात प्रश्न. |
| 3. | २१८ | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | नागपूर शहरातील या एकमात्र खासदार (काँग्रसच्या) स्व. अनुसयाबाई काळे यांच्या नावाने सुरु असलेल्या महिला समुपदेशन केंद्र या संदर्भात प्रश्न. |
| 4. | २१९ | सौ. दिव्या दिपक धुरडे | नागपूर महानगरपालिकेने नागपूर शहरात २०१२ पासून कन्या स्त्रीभ्रुण हत्येच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | किती केसेस शोधल्या या संदर्भात प्रश्न. |
| 5. | २२० | श्री. विक्रम जगदीश ग्वालबंशी | भांडेवाडी या डंपींग यार्डमध्ये संबंधित दोन्ही कचरा संकलन कंपनी संदर्भात प्रश्न. |
| 6. | २२१ | श्री. पुरुषोत्तम हजारे | मौजा पारडी भांडेवाडी येथे आठवडी बाजाराकरिता आरक्षित जागा आहे का? ही जागा स्मार्ट सिटीकरिता देण्यात आली का? या संदर्भात प्रश्न. |
| 7. | २२२ | सौ. परिणिता परिणय फुके | नागपूर शहरातील निर्जीव झाडे किंवा रस्त्यावर आलेल्या झाडांची विल्हेवाट लावण्यात आली का...? संदर्भात प्रश्न |
| 8. | २२३ | ॲड धर्मपाल मेश्राम | प्रभाग क्र. २६ अ मधील रस्ते व चौकाचे नामकरण प्रस्तावा संदर्भात प्रश्न |
| 9. | २२४ | ॲड धर्मपाल मेश्राम | महापौर ॲप उपलब्ध असतांना प्रशासनाने नागपूर लाईव्ह ॲप निर्मीती केली हे खरे आहे काय या संदर्भात प्रश्न |

नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करणे.

1. म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 20.01.2020 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 20.01.2020 सकाळी 11.15 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 20.01.2020 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. विशेष सभा दिनांक 27.01.2020 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
5. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 27.01.2020 सकाळी 11.25 वाजता चे कार्यवृत्तम.
6. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 27.01.2020 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त

टिप :— उपरोक्त सभेचे मुळ कार्यवृत्त नस्तीत टाचन असून हे कार्यवृत्त दिनांक 20.03. 2020 रोजी भरणाऱ्या सभेच्या विषय पत्रिकेसोबत मा. सदस्यांना दिनांक 11.03. 2020 रोजी विषय पत्रिकेसोबत सलग्न करुन पाठविण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करणे. (दि. 20.06.2020 करीता)

1. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 13.02.2020 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 20.02.2020 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 20.02.2020 सकाळी 11.15 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 20.02.2020 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त

टिप :— उपरोक्त सभेचे मुळ कार्यवृत्त नस्तीत टाचन असून हे कार्यवृत्त दिनांक 20.06. 2020 रोजी भरणाऱ्या सभेच्या विषय पत्रिकेसोबत मा. सदस्यांना दिनांक 12.06. 2020 रोजी विषय पत्रिकेसोबत सलग्न करुन पाठविण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे खालील कार्यवृत्त कायम करणे.

1. स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती.
   1. मंगळवार दि. 21.01.2020 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत
2. वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समिती
   1. गुरुवार दि. 26.12.2019 दुपारी 01.00 वाजता चे कार्यवृत्त

2. शुक्रवार दि. 31.01.2020 दुपारी 01.30 वाजता चे कार्यवृत्त

3. विधी व सामान्य प्रशासन विशेष समिती

1. सोमवार दि. 24.02.2020 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त

4. शिक्षण समिती

1. गुरुवार दि. 23.01.2020 दुपारी 01.00 वाजता चे कार्यवृत्त

5. गलिच्छ वस्ती निर्मुलन घर बोधणी विशेष समिती

1. सोमवार दि. 06.01.2020 दुपारी 01.00 वाजता चे कार्यवृत्त

6. क्रिडा विशेष समिती

1. मंगळवार दि. 04.02.2020 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

7. महिला व बाल कल्याण विशेष समिती

1. शनिवार दि. 27.12.2019 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त
2. मंगळवार दि. 14'01.2020 दुपारी 01.00 वाजता चे कार्यवृत्त
3. सोमवार दि. 03'02.2020 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

8. कर आकारणी व कर संकलन विशेष समिती

1. मंगळवार दि. 21.01.2020 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त
2. मंगळवार दि. 11'02.2020 सायंकाळी 04.00 वाजता चे कार्यवृत्त

9. अग्निशमन व विद्युत विशेष समिती

1. गुरुवार दि. 30.01.2020 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

टिप :— उपरोक्त सभेचे मुळ कार्यवृत्त नस्तीत टाचन असून हे कार्यवृत्त उपरोक्त विशेष समितीच्या मा. सदस्यांना पाठविण्यांत आले आहे.

नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे तिमाही अहवाल मा. सदस्यांच्या माहितीस्तव सादर प्रस्तुत.

1. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १४—११—२०१९ रोजी दुपारी ०३—०० वाजता
2. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २९—११—२०१९ रोजी दुपारी ०३—०० वाजता
3. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १०—१२—२०१९ रोजी दुपारी ०३—०० वाजता
4. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १९—१२—२०१९ रोजी दुपारी ०३—०० वाजता
5. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २७—१२—२०१९ रोजी दुपारी ०३—०० वाजता
6. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०७—०१—२०२० रोजी दुपारी ०३—०० वाजता
7. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १४—०१—२०२० रोजी दुपारी ०३—०० वाजता
8. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २७—०१—२०२० रोजी दुपारी ०३—०० वाजता
9. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०६—०२—२०२० रोजी दुपारी ०३—०० वाजता
10. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १४—०२—२०२० रोजी दुपारी ०३—०० वाजता
11. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १६—०३—२०२० रोजी दुपारी ०२—३० वाजता
12. म.न.पा. स्थायी समिती **विशेष** सभा दिनांक १६—०३—२०२० रोजी दुपारी ०३—०० वाजता
13. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १९—०३—२०२० रोजी दुपारी ०१—३० वाजता
14. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०५—०५—२०२० रोजी सकाळी ११—३० वाजता
15. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०१—०६—२०२० रोजी सकाळी ११—३० वाजता
16. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १६—०६—२०२० रोजी सकाळी ११—३० वाजता
17. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०३—०७—२०२० रोजी दुपारी १२—०० वाजता

टिप :— उपरोक्त सभेचे अहवाल नस्तीत उपलब्ध आहे.

**मागील विचाराधिन विषय**
**(दिनांक २०-१२-२०१९)**

**वि.क्र.१३ :-**
**{वाहतूक विभाग }**

नागपूर शहरातील वाहतुकीच्या कोंडीबाबत जनहित याचिका क्र. ५/२०१६ मध्ये वाहतुकीची कोंडी संपुष्टात आणण्याकरीता मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे विस्तृत पार्किंग व्यवस्थापन आराखडा मे.

यु.एम.टी. कंपनी हैद्राबाद यांनी तयार केलेला आहे. या विस्तृत पार्किंग व्यवस्थापन आराखडयामध्ये प्रामुख्याने शहरातील मुख्य भागालगत असलेले मुख्य तसेच लहान रस्ते, या ठिकाणी पार्किंग व्यवस्था करणे, नो पार्किंग व पार्किंगची जागा ठरविणे, रस्त्याच्या बाजुला पार्किंग स्थळ ठरविणे, रस्त्यावर व्यवस्थीतरित्या पार्किंगची व्यवस्था करणे इं. बाबींचा समावेश आहे.

मे. यु.एम.टी.सी. यांनी तयार केलेल्या विस्तृत पार्किंग व्यवस्थापनच्या अंतिम आराखडयास मंजुरी प्रदान करण्याचा विषय ठराव क्र. ४४४/वि.क्र. ३६३ दि. २२/८/२०१९ म.न.पा. सदना समक्ष सादर करण्यात आला असता सभागृहासमोर प्रेझेंटेशन दाखवून चर्चा करण्यास्तव पुढच्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा अशा सुचना देण्यात आल्या. पुढील विशेष सभेत ठराव क्र. ४५९ दि. २०/९/२०१९ अन्वये सुध्दा सभागृहासमोर प्रेझेंटेशन दाखवून चर्चा करण्यास्तव पुढच्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा अशा सुचना प्राप्त आहेत.

करीता मे. यु.एम.टी.सी. यांनी तयार केलेल्या विस्तृत पार्किंग व्यवस्थापनच्या अंतिम आराखडयास सभागृहासमोर प्रेझेंटेशन दाखवून, चर्चा करुन मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

पार्किंग व्यवस्थापनेचा आराखडा संबंधातील संक्षिप्त माहिती पुढील प्रमाणे आहे.

१) स्थायी समिती ठराव क्र. ४४२ दिनांक ३०.०१.२०१८ अन्वये विस्तृत पार्किंग व्यवस्थापनेचा आराखडातयार करण्यास्तव मंजूरी प्राप्त आहे.

२) सदरील ठरावाचे अनुषंगाने मे. यु.एम.टी.सी. हैद्राबाद, यांना दि. २२.०२.२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला. त्यानुषंगाने त्यांनी नागपूर शहराकरीता विस्तृत पार्किंग व्यवस्थापनेचा आराखडा तयार करुन त्याचे सादरीकरण दिलेले आहे.

३) शहरात विविध ठिकाणी वाहन ठेवण्यास्तव जागा निश्‍चित नसल्याने अस्ताव्यस्त असे वाहन उभे करण्यात येतात. परिणामत: वाहतुकीस अडथळा निर्माण होवून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव मे. यु.एम.टी.सी., हैद्राबाद यांनी शहरातील पार्किंग व्यवस्थेबाबत सर्व्हेक्षण करुन नागपूर शहरातील पार्किंग व्यवस्थापनेचा आराखडा तयार केलेला आहे.

**(दिनांक २०/०१/२०२०)**

**<u>वि.क्र.४४ :-</u>** **<u>विकास योजना — नागपूर</u>**

**{नगर रचना विभाग}** खसरा क्र. ६३ ते ६९ व ७१, मौजा (परसोडी) येथील नेल्को गृहनिर्माण सहकारी संस्था, नागपूर मधील विकास योजनेतील “प्राथमिक शाळा (एम.एस.डब्लु-१३) व लायब्ररी (एम.एस.डब्लु-१२)” असे एकुण क्षेत्र १.२४६५ हे. जागा आरक्षणातून वगळून “सार्वजनिक — निमसार्वजनिक व पार्किंग (एस.डब्लु-८२)” एकुण क्षेत्र ०.४०३५ हे. जागा मंजुर अभिन्यासासह दर्शविलेले अंदाजे ०.०६७२ हे. क्षेत्र कायम ठेवून उर्वरीत जागा “निवासी” उपयोग करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१कक) अंतर्गत किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र.टिपीएस-२४९६-२६४३-प्र. क्र.३००(अ) -९७-नवी-९, दि ०७ जानेवारी २००० अन्वये भागश: मंजूर झाली असून ती दिनांक १ मार्च २००० पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दि १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र. क्र.-७६/नवि-९ दि २७.०२.२००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४/२०१९-नवि-९, दि २७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेतील खसरा क्र. ६३ ते ६९ व ७१, मौजा (परसोडी) येथील नेल्को गृहनिर्माण सहकारी संस्थेची जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या “भामटी परसोडी स्ट्रिट स्किम” अंतर्गत समाविष्ट असलेल्या जागेवरील “प्राथमिक शाळा (एम.एस.डब्लु-१३) व लायब्ररी (एम.एस.डब्लु-१२)” असे एकुण क्षेत्र

१.२४६५ हे. जागा आरक्षणातून वगळून " सार्वजनिक – निमसार्वजनिक व पार्किंग (एस.डब्लु-८२)" एकुण क्षेत्र ०.४०३५ हे. जागे (मंजुर अभिन्यासात दर्शविलेले केवळ) मधील ०.०६७२ हे. क्षेत्र कायम ठेवून उर्वरीत उर्वरीत क्षेत्र ०.३३६३ हे. "निवासी" उपयोग करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत फेरबदल करणेबाबत उप संचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी कळविलेले आहे. उक्त जागा नागपूर सुधार प्रन्यासचे "भामटी परसोडी स्ट्रिट स्किम" अंतर्गत समाविष्ट आहे.

सबब सदर प्रस्तावातील फेर बदलासंबंधी संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यास्तव खसरा क्र. ६३ ते ६९ व ७१, मौजा ( परसोडी) येथील नेल्को गृहनिर्माण सहकारी संस्थेची जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या "भामटी परसोडी स्ट्रिट स्किम" अंतर्गत समाविष्ट असलेल्या जागेवरील "प्राथमिक शाळा (एम.एस.डब्लु-१३) व लायब्ररी (एम.एस.डब्लु-१२)" असे एकुण क्षेत्र १.२४६५ हे. जागा आरक्षणातून वगळून " सार्वजनिक – निमसार्वजनिक व पार्किंग (एस.डब्लु-८२)" एकुण क्षेत्र ०.४०३५ हे. जागे (मंजुर अभिन्यासात दर्शविलेले केवळ) मधील ०.०६७२ हे. क्षेत्र कायम ठेवून उर्वरीत उर्वरीत क्षेत्र ०.३३६३ हे. "निवासी" उपयोग करणेस्तव महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्यासाठी मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे यास्तव सादर. उक्त ठरावाची प्रत नस्तीचे उजव्या बाजुस संलग्न केलेली आहे.
(सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## (दि. २०-०३-२०२० रोजीच्या विषय पत्रिकेवरिल विषय)

**वि.क्र.७४ :-**
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग (ब) नगर विकास विभाग दि. ०१ जुलै २०१९ प्रकाशित केलेली अधिसुचना प्राप्त झाली असुन महाराष्ट्र शासन राज्यातील महानगरपालिके मध्ये सदर उपविधीची अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्राप्त असल्यामुळे म.न.पा. ठराव क्र. ४४१, दिंनाक २२/०८/२०१९, म.न.पा ठराव क्र. ४५३ दि. २२/०८/२०१९ व म.न.पा ठराव क्र. ६७ दि. २०/०२/२०२० अन्वये सदरचा विषय सभागृहाचे माहितीस्त्व सादर.
टिप :- सदर उपविधी नस्तीत संलग्न आहे.

## (दि. २०-०६-२०२० रोजीच्या विषय पत्रिकेवरिल विषय)

**वि.क्र.८२ :-** **विकास योजना – नागपूर.**
**{नगररचना विभाग }**

चंदनबाई टेम्पल प्रिसींट या अभिन्यास नकाशातील मौजा – नागपूर, खसरा क्र. ४९० मधील भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे एकुण ९ भुखंडकाचा मंजुर विकास योजनेत " सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) " ऐवजी " निवासी" उपयोग दर्शविण्याबाबत विकास योजनेत आवश्यक बदल दर्शविणेबाबत.

**संदर्भ** –१) अधिक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर यांचे या कार्यालयास असलेले पत्र क्र. अधि.अभि./रचना/९२८, दि ०७.०६.२००८
२) या कार्यालयाचे प्रस्तावाखालील भुखंडधारक यांचे प्रतिनिधी व सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर सुधार प्रन्यास, यांना पृष्ठांकित केलेले पत्र क्र. मनपाना/नरवि/१९२६, दि २५.०१.२०१९.
३) उपसंचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर यांचे प्रस्तावाखालील भुखंडधारक यांचे प्रतिनिधी यांना असलेले तसेच या कार्यालयास पृष्ठांकित असलेले पत्र क्र.उसंनर/रचना/८२१, दि २८.०१.२०१९ (या कार्यालयास प्राप्त दि. ३१.०१.२०१९)
४) प्रस्तावाखालील भुखंडधारकांचे प्रतिनिधी यांचे या कार्यालयास असलेले पत्र दि ०२.०३.२०१९

५) उपसंचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर यांचे सचिव – २, संपत्ती, नागपूर सुधार प्रन्यास यांना उद्रदेशून असलेले तसेच या कार्यालयास पृष्ठांकित असलेले पत्र क्र. उसंनर/रचना/२६१३, दि २६.०३.२०१९.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्र क्र. १ व ३ अन्वये अधिक्षक अभियंता व उपसंचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर यांनी मौजा – नागपूर, खसरा क्र. ४९०, नागरोड व उमरेड रोड यांच्या जक्शनवर दक्षिणेकडे नागपूर सुधार प्रन्यासचा चंदनबाई टेम्पल प्रिसींट हा अभिन्यास आहे व तो पुर्णपणे विकसीत देखील झालेला आहे. ही जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या इंडस्ट्रीयल बस्ती इम्पुव्हमेंट स्कीम अंतर्गत समाविष्ट असून शासनाच्या दि. २७.०२.२००२ च्या अधिसूचनेनूसार उक्त जागेकरीता नियोजन "नागपूर महानगरपालिका" आहे.

- उपरोक्त अभिन्यासाच्या जागेत उत्तरेकडे बहुतांश जागेवर विद्यमान चर्च असून ही वास्तु पुरातन आहे व चर्चच्या दक्षिणेकडे नागपूर सुधार प्रन्यासने सन १९५३ ते १९९५ दरम्यान भुखंड क्र. ४३५ ते ४४३ अशी एकुण ९ भुखंडके "निवासी" उपयोगाकरीता वाटप केले आहेत.
- तथापी, १९७६ च्या मुळ मंजुर विकास योजनेत उक्त भुखंड क्र. ४३५ ते ४४३ अशी एकुण ९ भुखंडाची जागा ही "चर्च" प्रांगणात दर्शविण्यात आली व तदनंतर दि ०७.०१.२००० च्या सुधारीत मंजुर विकास योजनेत देखील अनावधाने चर्च प्रांगणाची हद्द ही १९७६ च्या विकास आराखडयानूसार कायम दर्शविण्यात आली असल्यामुळे दि. ०७.०१.२००० च्या प्रचलित विकास योजनेत ही संपुर्ण जागा विद्यमान चर्चकरीता लाल रंगाने (Public –Semipublic) सार्वजनिक – निमसार्वजनिक विभागात दर्शविण्यात आलेली आहे.
- सदर भुखंडे नागपूर सुधार प्रन्यासने लिजवर सन १९५३ ते १९६७ या कालावधी दरम्यान निवासी वापराकरीता वाटप करण्यात आले असून, सध्यास्थितीत उक्त भुखंड क्र. ४३५ ते ४४३ चे उपयोगनिहाय तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | भुखंड क्र. | नागपूर सुधार प्रन्यासच्या वाटपाची तारीख व वाटपाप्रमाणे उपयोग | DP 76 प्रमाणे उपयोग | DP 2001 प्रमाणे उपयोग | जागेवरील सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४३५ | दि. २८.०३.१९६७ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| २ | ४३६ | दि. १७.१२.१९५३ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ३ | ४३७ | दि. २९.१२.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ४ | ४३८ | दि. ०७.११.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ५ | ४३९ | दि. ०६.०१.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ६ | ४४० | दि. ०६.०१.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ७ | ४४१ | दि. २३.१२.१९५३ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ८ | ४४२ | दि. २७.१२.१९५४ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |
| ९ | ४४३ | दि. ०३.०३.१९६५ निवासी | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) | निवासी |

- आता उक्त भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे ९ "निवासी" भुखंडाचे पटटापंजीयनाचा पुर्वकालावधी (३० वर्ष) संपुष्ठात आल्यानंतर उक्त भुखंडाचे नुतनीकरण करतांना भुखंड उपयोग सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) असल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यास ला अडथळे निर्माण होतात.

- शासनाच्या दि. २७.०२.२००२ च्या अधिसूचनेनूसार उक्त भुखंडकाचा मंजुर विकास योजनेत सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) ऐवजी "निवासी" उपयोग बदल करणेकरीता नागपूर सुधार प्रन्यासने कळविले आहे.

उपरोक्तनुसार प्रस्तावाखालील भुखंडाचे मालकीहक्काचे दस्तावेजांचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्लॉट नं . | मालकी हक्काचे दस्तावेजाचे विवरण |
|---|---|---|
| १ | ४३६ | १) NIT लिजडिड, २) पॉवर ऑफ अॅटर्नी |
| २ | ४३७ | १) NIT ग्राउंड रेन्ट, २) रजिस्ट्री , ३) NMC Tax |
| ३ | ४३८ | १) NIT लिजडिड, २) ग्राउंड रेन्ट NIT , ३) आखिवपत्रिका |
| ४ | ४३९ | १) NIT लिजडिड, २) सनद, ३) आखिवपत्रिका, ४) NMC Tax |
| ५ | ४४० | १) NIT लिजडिड, २) सनद, |
| ६ | ४४१ | १) NIT ग्राउंड रेन्ट, २) NIT लिजडिड, ३) NMC Tax |
| ७ | ४४२ | १) NIT लिजडिड, १) NIT ग्राउंड रेन्ट , ३) NMC Tax , ४) मॅप |
| ८ | ४४३ | १) NIT लिजडिड, २) NMC Tax , |

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र. क्र.३००(अ) -९७-नवी-९, दि ०१ मार्च २००० पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दि १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र. क्र.-७६/नवि-९ दि २७.०२.२००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४/२०१९-नवि-९, दि २७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेतील चंदनबाई टेम्पल प्रिसींट या अभिन्यास नकाशातील मौजा – नागपूर, खसरा क्र. ४९० मधील भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे एकुण ९ भुखंडकाचा मंजुर विकास योजनेत " सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च) " ऐवजी " निवासी" जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्याचे नागपूर सुधार प्रन्यासकडून प्रस्तावित असून उक्त भागाकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. उक्त जागेचे मुळधारक नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर असून विषयांकित जागेवरील भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे ९ भुखंडाकरीता नागपूर सुधार प्रन्यास या कार्यालयाने भुखंडधारकास यापुर्वी भाडेपटटा दिलेला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, उक्त भुखंडे चर्चकरीता दर्शविलेल्या सार्वजनिक – निमसार्वजनिक विभागात समाविष्ट असल्याने त्यामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे. मौजा – नागपूर, खसरा क्र. ४९० मधील भुखंड क्र. ४३५ ते ४४३ असे एकुण ९ भुखंडकाचा मंजुर विकास योजनेत **"सार्वजनिक – निमसार्वजनिक (चर्च)" ऐवजी "निवासी"** जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये मंजुर विकास योजनेत फेरबदल करणेकरीता महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन, त्यावरील नागरीकामार्फत प्राप्त आक्षेप/हरकतींवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्यासाठी मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे यास्तव सादर. उक्त ठरावाची प्रत नस्तीचे उजव्या बाजुस संलग्न केलेली आहे.

(सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.)

**वि.क्र.८३ :-** महाराष्ट् महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८ अन्वये
**{कर विभाग}** मालमत्ता करामध्ये समाविष्ट असलेले कर पुढील आर्थीक वर्षात महानगरपालिकेव्दारे कर ज्या दरानी बसविण्यात येतील तसेच ते की पुढील सरकारी वर्षात ज्या दरानी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा याबाबत महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवून फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापुर्वी महाराष्ट् महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ च्या तरतूदी अन्वये निश्चीत करणे आवश्यक आहे. त्या अनूषंगाने कार्यालयीन प्रस्तावास स्थायी समितीनी ठराव क्र. ८९४ दिनांक १४-०१-२०२० अन्व्ये विचारात घेवून एकमताने मंजुरी प्रदान केली. करीता सन २०२०-२०२१ हया आर्थीक वर्षामध्ये मालमत्ता करांतर्गत आकारावयाचे विविध कर व त्यांचे दरास स्थायी समितीनी ठराव क्र. ८९४ दिनांक १४-०१-२०२० अन्वये खालील प्रमाणे मान्यता प्रदान केलेला प्रस्ताव महाराष्ट् महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ चे तरतूदीन्वये विचारात घेवून मंजुरी प्रदान करणे बाबतचा उचित निर्णय घेणेबाबत.

**<u>महाराष्ट् महानगरपालिका अधीनियमानुसार सन २०२०-२१ मध्ये</u>**
**<u>मालमत्ता कराअंतर्गत आकारावयाचे प्रचलीत व प्रस्तावित कर व त्यांचे दर</u>**

| अनू क्र. | कराचा प्रकार | सन २०१९-२० मध्ये प्रचलित दर | | सन २०२०-२१ चे विभागाव्दारे प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | वार्षीक भाडे मुल्य | कराचा दर | वार्षीक भाडे मुल्य | कराचा दर |
| १ | सामान्य कर | १ ते २००० | १४% | १ ते २००० | १४% |
| | | २००१ ते ५००० | १८% | २००१ ते ५००० | १८% |
| | | ५००१ ते २०००० | २२% | ५००१ ते २०००० | २२% |
| | | २००१ ते ५०००० | २६% | २०००१ ते ५०००० | २६% |
| | | ५००१ व त्याचे वर | ३०% | ५००१ व त्याचे वर | ३०% |
| २ | साफसफाई किवा मलप्रवाह कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १२% | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १२% |
| ३ | मलप्रवाह लाभ कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% |
| ४ | पाणी पट्टी कर | १ ते २००० (वार्षीक भाडे मुल्याकरीता) | १०% | १ ते २००० | १०% |
| | | २००१ ते ५००० (वार्षीक भाडे मुल्याकरीता) | १२% | २००१ ते ५००० | १२% |
| | | ५००१ व त्याचे वर (वार्षीक भाडे मुल्याकरीता) | १५% | ५००१ व त्याचे वर | १५% |
| ५ | पाणी पूरवठा लाभ कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% |
| ६ | अग्नीशमन कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% |
| ७ | दिवाबत्ती कर | लागु नाही | | लागू नाही | |
| ८ | रस्ते (पथ) कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% |
| ९ | म.न.पा. कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% |
| १० | वृक्ष कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १% |

**<u>याव्यतिरिक्त शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरेन्ट, मंगल कार्यालये, लॉन्स व हॉस्पीटल्स या मालमत्तांवर खालील दराने वार्षीक विशेष सफाइ कर आकारण्यात यावा.</u>**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष् सफाई | वार्षीक भाडे मुल्य ५०००० पावेतो | ७% | वार्षीक भाडे मुल्य ५०००० पावेतो | ७% |
| | | वार्षीक भाडे मुल्य ५०००१ व त्यापेक्षा जास्त | १०% | वार्षीक भाडे मुल्य ५०००१ व त्यापेक्षा जास्त | १०% |

**महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमानुसार सन २०२०-२१ मध्ये मालमत्ता कराअंतर्गत राज्य शासनाचे कर व त्यांचे दर**

| अनू क्र. | कराचा प्रकार | सन २०१९-२० मध्ये प्रचलित दर | | सन २०२०-२१ चे विभागाव्दारे प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | वार्षीक भाडे मुल्य | कराचा दर | वार्षीक भाडे मुल्य | कराचा दर |
| १ | शिक्षण कर ( नीवासी) | १ ते १५० | २% | १ ते १५० | २% |
| | | १५१ ते ३०० | ३% | १५१ ते ३०० | ३% |
| | | ३०१ ते ३००० | ४% | ३०१ ते ३००० | ४% |
| | | ३००१ ते ६००० | ५% | ३००१ ते ६००० | ५% |
| | | ६००१ व त्याचे वर | ६% | ६००१ व त्याचे वर | ६% |
| २ | शिक्षण कर ( निवासी) | १ ते १५० | ४% | १ ते १५० | ४% |
| | | १५१ ते ३०० | ६% | १५१ ते ३०० | ६% |
| | | ३०१ ते ३००० | ८% | ३०१ ते ३००० | ८% |
| | | ३००१ ते ६००० | १०% | ३००१ ते ६००० | १०% |
| | | ६००१ व त्याचे वर | १२% | ६००१ व त्याचे वर | १२% |
| ३ | रोजगार हमी कर (फक्त अनिवासी) | १ ते १५० | १% | १ ते १५० | १% |
| | | १५१ ते ३०० | १.५% | १५१ ते ३०० | १.५% |
| | | ३०१ ते ३००० | २% | ३०१ ते ३००० | २% |
| | | ३००१ ते ६००० | २.५% | ३००१ ते ६००० | २.५% |
| | | ६००१ व त्याचे वर | ३% | ६००१ व त्याचे वर | ३% |
| ४ | मोठया निवासी इमारतीवरील कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १०% | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | १०% |

**टीप —**

**१)** स्थायी समिती कडून प्रस्तावित ठराव क्र. ८९४ दिनांक १४-०१-२०२० अन्वये मंजुरी प्राप्त झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम १९४९ चे कलम ९९ च्या तरतूदीनूसार २० फेब्रुवारी २०२० पूर्वी म.न.पा. सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**२)** या प्रस्तावामध्ये राज्य शासनाची शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठयानिवासी इमारतीवरील करांच्या दरामध्ये सुध्दा कुठलाही बदल शासनातर्फे करण्यात आलेला नाही.

**३)** तसेच सन २०१९-२०२० हया आर्थीक वर्षात प्रचलित दरात चालू आर्थीक वर्षात सन २०२०-२०२१ मध्ये कोणतीही वाढ सुचविण्यात आली नाही.

४) सविस्तर टीपणी नस्तीत उपलब्ध आहे.

**<u>वि.क्र.८४</u> :-** पोलीस उपायुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
**{सा.प्र.वि.)}** यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार श्री. रामेश्वर लक्ष्मण नंदनवार, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, (बडतर्फ दि. ०६/०३/२०२०) यांचे विरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्याची परवनगी "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" चे कलम ५९ अ अन्वये प्राप्त अधिकारानुसार आयुक्त यांनी दि. ०३/०३/२०२० रोजी दिलेली आहे.

करीता कृपया म.न.पा. सभागृहाचे माहितीकरिता सादर.

**<u>वि.क्र.८५</u> :-** पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी केलेल्या
**{सा.प्र.वि.)}** विनंती अर्जानुसार १) श्री. विलास श्रीरामजी चरडे, ऐवजदार, आरोग्य विभाग २) श्री. सुरेश कृष्णराव डांगे, ऐवजदार, आरोग्य विभाग (कार्यरत कारखाना विभाग) यांचे विरुध्द न्यायालयात

अभियोग दाखल करण्याची परवनगी "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" चे कलम ५९ अ अन्वये प्राप्त अधिकारानुसार आयुक्त यांनी दि. १७/०२/२०२० रोजी दिलेली आहे.
करीता कृपया मनपा सभागृहाच्या माहितीकरिता सादर.

## नवीन विषय

**वि.क्र.९६ :-**
**{स्थावर विभाग}**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ अन्वये नागपूर महानगरपालिका सीमेत विवक्षित गोष्टी ठेवणे करीता आणि विवक्षित व्यवसाय व कामे करणेकरीता संबंधीतांनी आयुक्त नागपूर महानगरपालिकेकडून घेणे आवश्यक असलेला परवानाबाबत कलम ४५८ तरतूदीन्वये तयार केलेल्या उपविधिचा मसूदा कलम ४५९ च्या तरतूदी अंतर्गत नागपूर महानगरपालिका सभागृहांनी विचारार्थ घेणे.

महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ च्या तरतूदीन्वये नागपूर महानगरपालिका आयुक्त यांचे लायसन्सशिवाय (परवानगीशिवाय) नागपूर महानगपालिकासीमेत विवक्षित गोष्टी न ठेवणे आणि विवक्षित कामे न करणे अभिप्रेत आहे ,

५ डिसेंबर २०१२ पर्यंत नागपूर महानगरपालिकेला लागू असलेल्या नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ चे कलम ३४८ मध्ये सुध्दा उक्त प्रकारची तरतूद होती. परंतू त्याकालावधीत त्या अनुषंगाने आवश्यक उपविधी तयार होवू न शकल्याने सदर तरतूदी अंतर्गत आवश्यक कार्यवाही होवू शकलेली नाही.

परंतू कोवीड—१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या कालावधीत नागपूर महानगरपालिका सीमेत किराणा दुकाने (घाऊक व किरकोळ विक्रेते), धान्य विक्रेते (घाऊक व किरकोळ विक्रेते), खाद्यतेल विक्रेत्यांचे दुकाने (घाऊक व किरकोळ विक्रेते), औषधांची दुकाने, बेकरी प्रॉकडक्टची दुकाने, दुग्ध व दुग्धजन्य पदार्थाची दुकाने बाबतची माहिती राज्य शासनाने मागीतलेली असता नागपूर महानगरपालिकेच्या बाजार विभागाकडे माहिती उपलब्ध नव्हती कारण कलम ३७६ च्या तरतूदीअंतर्गत आवश्यक परवाना नागपूर महानगरपालिकेकडून न घेता नागपूर महानगरपालिका सीमेत व्यावसाय व धंदे सुरू आहेत.

नागपूर शहर व्यवस्थापनेचे दृष्टीने व नागरीकांना तत्परतेने सेवा देण्याचे दृष्टीने नागपूर महानगरपालिका क्षेत्रात कोणत्या व्यावसायाचे व कोणत्या धंदयाचे किती व्यावसयीक आहेत / धंदा करणारे नागरीक आहेत ह्याबाबत माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे. नागपूर शहराची केंद्र शासनाचे स्मार्ट सिटी व मिशन अंतर्गत निवड झालेली असल्याने स्मार्ट सिटीच्या संकल्पनेत नागपूर महानगरपालिकेत सुरू असलेले व्यवसाय धंदा यासंबंधी योग्य व अचूक माहिती उपलब्ध असणे हा एक अत्यंत महत्वाचा भाग आहे.

नागपूर महानगरपालिका सीमेत नागपूर महानगरपालिका आयुक्त यांचे परवानगीशिवाय विवक्षित गोष्टी ठेवल्या जावू नये आणि विवक्षित व्यवसाय व कामे केल्या जावू नये ह्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ च्या तरतूदीन्वये विवक्षित गोष्टी ठेवणेकरीता आणि विवक्षित व्यवसाय व कामे करणेकरीता संबंधीतांनी आयुक्त नागपूर महानगरपालिका कडून लायसन्स (परवाना) घेणे बंधनकारक करणे आवश्यक असल्याने व सदर कलम ३७६ मध्ये उल्लेख केलेल्या प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोगात आणलेल्या सर्व जागा आणि तेथे चालवण्यात येणारे सर्व व्यवसाय व निर्मिती यावर नियंत्रण आणि देखरेख ठेवणे आणि अशा कोणत्याही जागेचे बांधकाम, आकार, हवा खेळण्याची , प्रकाशाची व्यवस्था, साफसफाई, जलनि:सारण आणि पाणिपूरवठा या गोष्टी विहीत करणे व नियमन करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ (२०) अन्वये उपविधीचा मसूदा तयार करण्यात आलेला आहे. कलम ४५९ च्या तरतूदीन्वये नागपूर महानगरपालिकेनी सदर मसूदा विचारार्थ घेणेबाबत निर्णय घेतल्यास कलम ४६० च्या पोटकलम अ, ब, क व ड च्या तदतूदीन्वये आवश्यक कार्यवही परीपूर्ण झाल्यानंतर कलम ४६१ च्या तरतूदीन्वये उक्त उपविधी महाराष्ट्र शासनाकडून कायम करून घेण्यात येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ मध्ये उल्लेख केलेल्या प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोगात आणलेल्या सर्व जागा व तेथे चालवण्यात येणारे सर्व व्यवसाय व निर्मिती यावर नियंत्रण व देखरेख ठेवणे आणि अशा कोणत्याही जागेचे बांधकाम, आकार, हवा खेळण्याची सोय, प्रकाशाची

व्यवस्था, साफसफाई , जलनि:सारण आणि पाणीपूरवठा या गोष्टी विहीत करणे व त्यांचे नियमन करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ (२०) अन्वये तयार करण्यात आलेल्या उपविधीचा मसूदा कलम ४५९ च्या तरतूदीन्वये विचारार्थ घेणे व तसेच उपविधीच्या मसूदासोबत जोडलेले अनुसूची क्र. १ नमूना ‘अ’, नमूना ‘ब’ व अनुसूची क्र. २ अन्वये प्रस्तावित शुल्क विचारात घेवून मान्यता देणे व कलम ४६० च्या तरतूदीन्वये आवश्यक असलेल्या कार्यवाही करीता आवश्यक कालावधी प्रमाणे उचित कार्यवाही करून घेणेबाबत निर्णय घेणे.

टिप – १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी / व्यवसायासाठी नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील जागा/ इमारत वापरणेस्तव आवश्यक परवान्यासाठी /परवान्याचे नुतणीकरणासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना ‘अ’ ( अनुसूची क्र. १) उपविधीच्या मसूदासोबत टांचण आहे.

टिप – २ ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३७६ प्रमाणे विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी / व्यवसायासाठी नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील जागा / इमारत वापरणेस्तव व्यावसायाच्या परवान्याचे प्रारूप नमूना ‘ब’ (अनुसूची क्र. २) उपविधाच्या मसूदासोबत टांचण आहे.

टिप – ३ ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३७६ प्रमाणे विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी /व्यावसायासाठी नागपूर महारनगरपालिका क्षेत्रातील जागा / इमारत वापरणेस्तव द्यावयाचे परवाना/ परवाना नुतणीकरणासाठी आकारावयाचे प्रस्तावित परवाना शुल्क / परवाना नुतणीकाण शुल्क तक्ता अनुसूची क्र. २ अन्वये उपविधीच्या मसूदासोबत टांचण आहे.

**वि.क्र.९७ :-**
**(शिक्षण विभाग)**

कोव्हीड १९ या विषाणुजन्य साथीच्या रोग प्रसारामुळे उद्भवलेल्या आणिबाणीच्या परिस्थितीत अध्ययन – अध्यापन प्रक्रिया सुरु राहण्यासाठी लर्नींग फ्रॉंम होम संकल्पना राबविण्यास्तव विद्यार्थ्यांना Android Tablet उपलब्ध करुन देण्याबाबत.

कोरोना (COVID – 19) विषाणूच्या जगभरातील वाढत्या प्रादुर्भावामुळे देशात व संपूर्ण राज्यात विपरीत परिस्थिती निर्माण झालेली आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये इयत्ता १० वी - १७२३ , इयत्ता १२ वी – २१५ असे १९३८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना Internet सुविधेसह Android Tablet उपलब्ध करुन दिल्यास या विद्यार्थ्यांचे नियमित शिक्षणा Online पध्दतीने सुरु ठेवता येईल. या प्रकल्पास **“Education Tab Bank”** असे संबोधन देवून पुस्तकपेढी या संकल्पनेप्रमाणे विद्यार्थ्यांना त्या-त्या शैक्षणिक वर्षामध्ये Tablet वापरण्याकरीता देण्यात येवून सत्र संपल्यानंतर परत घेवून पुढील वर्षी नविन विद्यार्थ्यांना वापरण्यास दिल्यास ही प्रक्रिया चालू राहून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ मिळू शकेल.

Online Education देण्यास्तव पुढील प्रमाणे संकल्पना राबविणे आवश्यक वाटते.

१) इयत्ता ९ वी व १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना Android Tablet उपलब्ध करुन देणे याकरीता मनपाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून Android Tablet च्या Technical Specification व किंमतीची मागणी घेण्यात आलेली असून खालील प्रमाणे

| Sr.N. | Tablet Model | Specification | Cost (Approx) | Required Nos. | Total Cost |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Samsung Galaxy Tab A / Lenova/ HP/ MI (Any Android Tablet with minimum specified configuration) | OS - Android Orio 8.0 or Higher | 10998 | 1950 | 21446100 |
| | | Connnectivity - WiFi + Cellular | | | |
| | | Cellular - 4G/LTE | | | |
| | | Ram - 2 GB or Higher | | | |
| | | Storage - 32 GB or Higher | | | |

२) Online शिक्षणास्तव Internet सुविधा उपलब्ध करुन देणे Mobile Internet सुविधा उपलब्ध करुन देणा-या JIO/IDEA-Vodafone/BSNL/Airtel या कंपन्यांकडून किमान 1.5 GB/per day data द्वारा Internet Plan सर्व Android Tablet साठी घेण्याकरीता प्रति कनेक्शन रु. १५०/- प्रति माह इतका दर अपेक्षित राहील. याप्रमाणे येणारा प्रथम वर्षाचा व आवर्ती स्वरुपाचा खर्च खालील प्रमाणे

| Sr. N. | No. of Connections | Rate per month | Annual Cost | Recurring Cost per year |
|---|---|---|---|---|
| 1 | 1950 | 150 | 3510000 | 3510000 |

मोठ्या संख्येने कनेक्शन घेणे असल्यामुळे या दरापेक्षा कमी दर निविदा पध्दत राबविल्यास स्पर्धा होवून प्राप्त होण्याची शक्यता आहे.

३) E-Learning Software –

अ) DIKSHA - प्रत्येक शिक्षक व विद्यार्थी यांना मोफत आणि मुबलक प्रमाणात ई-लर्निंग साहित्य मिळावे म्हणून केंद्र शासन (MHRD) आणि महाराष्ट्र शासनाने DIKSHa ई-लर्निंग प्लॅटफॉर्म सुरु केले आहे.

आ) क्रिएटिव्ह आणि क्रिटिकल थिंकिंग ( सीसीटी) प्रश्न

इ) ई- बालभारती

ई) बोलकी बालभारती ( Talking Books )

उ) इयत्ता 8 वी ते 10 वी विज्ञान, भूगोल, संस्कृत विषयाचे व्हिडीओ स्वरुपातील साहित्य

ऊ) बालभारती youtube वाहिनी

ऋ) किशोर मासिक

ऌ) अवांतर वाचनासाठी वेबसाईट व ॲप्लीकेशन Bolo

उपरोक्त प्रमाणे Online शिक्षण घ्यावयाचे असल्यास विद्यार्थ्यांकडे Internet सुविधेसह Android Mobile/Tablet असणे आवश्यक आहे. मनपा शाळांतील इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांकरीता हा प्रकल्प राबविणे संयुक्तीक वाटते. अ) अनावर्ती खर्च –

शैक्षणिक सत्र 2020-21 मध्ये <u>१९५०</u> विद्यार्थ्यांना Android Tablet – रु. २,१४,४६,१०० व Interner सुविधेस्तव – रु. ३५,१०,००० .याप्रमाणे रु. २,४९,५६,१०० खर्च अपेक्षित आहे.

ब) आवर्ती खर्च (Recurring) - Internet सुविधेचा खर्च (Recurring) आवर्ती स्वरुपाचा असून Service Providers च्या ठरविलेल्या/ बदलणा-या दराप्रमाणे यामध्ये कमी-जास्त बदल होवू शकतो. यासोबतच Android Tablet चे देखभाल-दुरुस्ती (Annual Maintainance Contract) एका वर्षानंतर करणे आवश्यक राहील. याकरीता प्रति Android Tablet रु. 1500/- याप्रमाणे रु. २९,२५,००० खर्च अनुमानीत राहील. प्रकल्प पुढे चालवावयाचा असल्यास मासिक Internet खर्च रु. ३५,१०,००० व Tablet च्या Annual Maintainance Contract साठी रु. २९,२५,००० असे एकूण रु. ६४,३५,००० हा आवर्ती (Recurring) स्वरुपाचा खर्च पुढील वर्षीपासून दरवर्षी लागण्याची शक्यता आहे. या कार्याकरीता शिक्षण विभागातील पद क्र. 461/A28202030801 (संगणक, प्रिंटर्स, झेरॉक्स व इतर खरेदी/ दुरुस्ती) या पदांतर्गत वाढीव निधीची मागणी स्थायी समितीकडे करण्यात आली आहे. तरतूद उपलब्ध न झाल्यास अन्य पद क्र. 428/A25202020808 (विद्यार्थ्यांकरीता पाठ्यपुस्तक व इतर खरेदी) अंतर्गत खर्चाचे प्रावधान देण्यात येईल. Android Tablet खरेदी व Internet Service Provider नेमणे हे कार्य ई-निविदा प्रक्रिया राबवून करणे किंवा थेट OEM/ Internet Service Provider यांना EOI मध्ये आमंत्रित करुन निवड करणे संयुक्तिक राहील.

सबब महानगरपालिकेच्या इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना Internet सुविधेसह Android Tablet उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव सादर.

(टिप – सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.)

**<u>वि.क्र.९८</u> :-**
**{समाज विकास विभाग}**

नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील विधवा, परितक्त्या, एकल महिला, कचरा वेचक, बांधकाम मजूर, चिंधी वेचक, मागासवर्ग, सफाई क्षेत्रातील कार्य करणाऱ्या परिवारातील सदस्य इ. या घटकातील होतकरु युवक-युवतीकरिता "नागपूर महानगरपालिका रोजगार निर्मिती कार्यक्रम" योजना सुरु करण्याचा विभागाचा मानस आहे. सदर्हु योजनेकरिता महानगरपालिकेच्या सन

२०२०-२१ चे अर्थसंकल्पात "समाज विकास" हे नवीन पद लेखाशिर्ष निर्माण करुन त्यात तरतूद करणेबाबतचा प्रश्न विचारात घेऊन मंजुरी प्रदान करणेस्तव सादर प्रस्तुत.
टिप :- सविस्तर माहिती नस्तीत संलग्न.

**वि.क्र.९९ :-**
**{समाज विकास विभाग)}**

नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग बांधवांकरिता पुढील वैयक्तिक तथा सामुहिक अर्थसहाय्य योजना सुरु करणेबाबत समाज विकास विभागाचे नियोजन आहे.

| अ.क्र . | विवरणजनेचे नांवयो / |
|---|---|
| १ | कृर्णबधिर दिव्यांगांना (Cochlear Implant) शस्त्रक्रियेकरिता अर्थसहाय्य योजना. |
| २ | वैयक्तिक स्वयंरोजगाराकरिता, दिव्यांग बचत गटांना स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य योजना. |
| ३ | मतीमंद घटकातील दिव्यांगांना निर्वाह भत्ता योजना. |
| ४ | शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षणाकरिता अर्थसहाय्य योजना. |
| ५ | सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजना. |
| ६ | प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (परवडणारी घरकूले) अंतर्गत नासुप्र, म्हाडा व मनपा तर्फे बांधण्यात आलेल्या व बांधण्यात येत असलेल्या मनपा हद्दीतील बांधकामकरिता सोडत पध्दतीने निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना शासन अनुदान रु. २.५ लक्ष सह रु. ५०,०००/- महानगरपालिकेकडुन (आर्थिक दृष्टया दुर्बल) अर्थसहाय्य योजना. |
| ७ | राज्य स्तरीय, राष्ट्रीय स्तरीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा मध्ये भाग घेणाऱ्या दिव्यांग खेळाडूंना आर्थिक सहाय्य योजना. |

योजनेचे प्रावधान पद क्र .A27301342302 (अंत्योदय योजना अपंग व दिव्यांगाकरिता मदत) अंतर्गत करण्यात येणाऱ्या ५% अर्थसंकल्प तदतुदीमधुन करण्यात येईल. उपरोक्त योजनेबाबतचा प्रस्ताव विचारात घेऊन मंजुरीस्तव सादर प्रस्तुत.

टिप :- सविस्तर माहिती नस्तीत संलग्न.

**वि.क्र.१०० :-**
**(सार्व. आ. अभि. विभाग)**

नागपूर शहरात नॉर्थ (झोन क्र. ७- सतरंजीपुरा, ९-आशीनगर, १०-मंगळवारी), सेंट्रल (झोन क्र. २- धरमपेठ, ६-गांधीबाग, ८-लकडगंज) व साऊथ (झोन क्र. १- लक्ष्मीनगर, ३-हनुमाननगर, ४-धंतोली, ५-नेहरुनगर) सिवरेज झोन अंतर्गत सिवर लाईन व चेंबर्सची देखभाल व दुरुस्तीचे एकूण रु. ३१,३०,२९,८६८/- कामाचा प्रस्ताव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

नागपूर शहर भारताचा भौगोलिक केंद्रबिंदू असून महाराष्ट्र राज्याची उपराजधानी आहे. नागपूर शहराचे क्षेत्रफळ २२७.५६ चौ.किमी. ऐवढे आहे. नागपूर शहराची सद्यस्थिती जनसंख्या अंदाजे २७.५० लक्ष ऐवढी आहे. नागपूर शहराला पेंच धरण, गोरेवाडा तलाव व कन्हान नदीतून एकूण सरासरी ६५० द.ल.लि. प्रतिदिन पाण्याचा पुरवठा होतो. सद्यस्थितीत नागपूर शहरात दररोज सुमारे ५०० ते ५२५ द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्याची निर्मिती होते.

नागपूर शहरात असलेल्या पिवळी नदी, नागनदी व पोहरा नदी यांचा उतार व दिशा (पश्चिम - पूर्व) बघता नागपूर शहराचे नॉर्थ, सेंट्रल व साऊथ असे तीन सिवरेज झोन मध्ये विभाजीत करण्यात आलेले आहे. या तिनही सिवरेज झोनमधील अंदाजे ७०% भाग हा सिवरेज नेटवर्कद्वारे व्यापलेला आहे. नागपूर शहरातील सिवर लाईनची लांबी अंदाजे १६७० किमी. इतकी असून व्यास १५० मिमी ते १८०० मिमी इतका आहे. मे. टाटा कन्सलंटींग इंजिनिअर्स प्रा. लि., मुंबई यांच्याद्वारे सन १९९९ ते २००० मध्ये नागपूर शहरातील सिवरेज, ड्रेनेज करीता ड्राईंग व अहवाल तयार करण्यात आलेला होता. त्यानंतर मे. शहा टेक्नीकल कन्सलटंट प्रा. लि., मुंबई यांचेद्वारे नागपूर शहराकरीता सन २००८ ते २०१० मध्ये JnNURM अंतर्गत सर्व समावेशक उत्तर, मध्य व दक्षिण सिवरेज झोन करीता विस्तृत सिवरेज प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला होता. परंतू निधी अभावी सदर प्रकल्पास केंद्रशासनाची मान्यता मिळू शकली नाही. हा प्रकल्प अहवाल १० वर्ष जूना असून त्यानंतर नागपूर शहराची व्याप्ती, बदलती भौगोलिक परिस्थिती व वाढीव जनसंख्या लक्षात घेता नव्याने सर्वेक्षण करुन विस्तृत सिवरेज प्रकल्प

अहवाल तयार करणे अपेक्षित आहे. याकरीता जास्त कालावधी लागण्याची शक्यता असून हे काम सुध्दा स्वतंत्रपणे हाती घेण्यात येईल.

सद्यपरिस्थितीत या तिनही सिवरेज झोनमधील सिवरेज लाईन व चेंबर्स देखभाल व दुरुस्तीची कामे मनपाच्या १० झोन मार्फत तुकडयांमध्ये करण्यात येत आहेत. या कामांचे कोणतेही रेखाचित्र (As build drawing) उपलब्ध नाहीत. यामुळे एकाच सिवरलाईनच्या एका कामाचा दुस-या कामासोबत समन्वय होत नसल्याने व Downstream साईडला सांडपाण्याचा सुव्यवस्थित निचरा होत नसल्याने या सर्व कामामध्ये एकसूत्रीपणा आणणे गरजेचे आहे. याबाबतचा आढावा घेतला असता सिवर लाईन व चेंबर्स चोकेजची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. ब-याचदा करण्यात आलेल्या कामाचा उतार (Gradient) बरोबर नसल्याने किंवा Bypass करण्यांत आलेली सिवर लाईन चेंबर्समध्ये वरचेवर टाकण्यांत आल्याने आणि ब-याच भागात सिवरलाईनवरील अतिक्रमणांमुळे साफसफाई करण्यास व दुरुस्ती करीता अडथळा निर्माण होतो व करण्यांत आलेल्या कामांचे उद्दीष्ट सफल होत नाही.

याकरीता नागपूर शहराअंतर्गत नॉर्थ, सेंट्रल व साऊथ सिवरेज झोन अंतर्गत खालीलप्रमाणे सिवर लाईन व चेंबर्स देखभाल व दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करण्यांत आलेले आहेत.

१) नॉर्थ सिवरेज झोन : रु. १०,३५,९४,०४९/-
(झोन क्र. ७- सतरंजीपुरा, ९-आशीनगर, १०-मंगळवारी)

२) सेंट्रल सिवरेज झोन : रु. ४,९८,९६,४८५/-
(झोन क्र. २- धरमपेठ, ६-गांधीबाग, ८-लकडगंज)

३) साऊथ सिवरेज झोन : रु. १५,९५,३९,३३४/-
(झोन क्र. १- लक्ष्मीनगर, ३-हनुमाननगर, ४-धंतोली, ५-नेहरुनगर)

एकूण : रु. ३१,३०,२९,८६८/-

प्रस्तावित सिवर लाईन व चेंबर्स देखभाल व दुरुस्तीचे कामामध्ये अस्तित्वातील जून्या खराब झालेल्या सिवर लाईन्स व चेंबर्सची दुरुस्ती करण्यात येईल. नॉर्थ सिवरेज झोन अंतर्गत (झोन क्र. ७- सतरंजीपुरा, ९-आशीनगर, १०-मंगळवारी) एकूण २२.१५४ किमी., सेंट्रल सिवरेज झोन अंतर्गत (झोन क्र. २- धरमपेठ, ६-गांधीबाग, ८-लकडगंज) एकूण ८.७७८ किमी. व साऊथ सिवरेज झोन अंतर्गत (झोन क्र. १- लक्ष्मीनगर, ३-हनुमाननगर, ४-धंतोली, ५-नेहरुनगर) एकूण २८.६५१ किमी. पाईपलाईन दुरुस्ती प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. यामध्ये नविन सिवर लाईनचे कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. तसेच नागपूर शहरातील मुख्य मलवाहिनी टाकण्याचे देखील प्रस्तावित करण्यात आलेले नाही. मुख्य मलवाहिनी करीता जास्त कालावधी लागण्याची शक्यता बघता हे काम विस्तृत अहवाल तयार करुन स्वतंत्रपणे करण्यात येईल. प्रस्तावित नॉर्थ, सेंट्रल व साऊथ झोनचे देखभाल दुरुस्तीचे कामात RCC pipe, Eco drain pipe, RCC chambers, DI/SFRC/RCC/FRP covers, control low strength material and M-२० grade concrete for restoration, traffic management, testing आदी बाबींचा समावेश आहे. उपरोक्त तिनही सिवरेज झोनचे प्रस्ताव संबंधित झोनचे कार्यकारी अभियंता यांनी तेथील कामाची निकड व आवश्यकता लक्षात घेवून सादर केलेले असून मल:निस्सारण शेवटपर्यंत (End Point पर्यंत) सुव्यवस्थितरित्या होईल याची पुरेपुर काळजी झोनल अभियंत्यांमार्फत घेण्यांत येईल. यामुळे मनपातर्फे भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या Suction Cum Jetting Machine वरील ताण बहुतांशी कमी होण्यास मदत होईल. सदर प्रस्तावित सिवरेज झोन अंतर्गत या प्रस्तावित कामांमुळे सध्या प्राप्त तक्रारी दूर होण्यास मदत होईल आणि यथावकाश सिवरेजच्या मुख्य प्रकल्पाचा भाग म्हणून यातील अंदाजे ८०% काम उपयोगी होईल.

सदर्हु प्रस्तावित नॉर्थ, सेंट्रल व साऊथ सिवरेज झोन अंतर्गत कामे मंजुरीनंतर रितसर ३ निविदा बोलावून करण्यांत येतील. नियुक्त केलेल्या कंत्राटदारामार्फत अस्तित्वातील व नव्याने प्रस्तावित करण्यांत आलेल्या सिवरलाईन व चेंबर्सचे संपूर्ण नकाशे (As build drawing) तयार करुन घेण्यांत येतील, चेंबर्सला क्रमांक देण्यांत येतील, GIS रेखांकन Geo-Referencing करण्यात येईल. नियुक्त कंत्राटदारास प्रत्येक प्रभागात ४ वर्कर्स व १ सुपरवाईजर ची टिम देणे अनिवार्य राहील. तसेच प्रत्येक प्रभागाकरीता Machinery, Equipment देणे कंत्राटदारास बाध्य राहील. प्रत्येक झोनच्या कार्यकारी अभियंता यांचेमार्फत दैनंदिन स्वरुपात देण्यांत येणा-या मागणीपत्रक (Requisition Form) प्रमाणे कंत्राटदारास प्रत्येक प्रभागाअंतर्गत काम पूर्ण करणे अनिवार्य राहील.

करिता उपरोक्तप्रमाणे प्रस्तावित नॉर्थ (झोन क्र. ७, ९ व १०), सेंट्रल (झोन क्र. २, ६ व ८) आणि साउथ (झोन क्र. १, ३, ४ व ५) सिवरेज झोन अंतर्गत सिवरलाईन व चेंबर्स देखभाल व दुरुस्तीच्या कामाचे एकूण प्राकलनीय राशी रु. ३१,३०,२९,८६८/- (१०,३५,९४,०४९ + ४,९८,९६,४८५+१५,९५,३९,३३४/-) चे कामास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे

**वि.क्र.१०१ :-**
{**सार्व. आरो. अभि. विभाग**)}

नागपूर शहरात जलवाहिनी नसलेल्या भागात टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबतचा व त्यावर GPRS प्रणाली लावण्याचा प्रश्न विचारात घेणेबाबत.

नागपूर शहरात २४X७ अखंडित पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नेटवर्क असलेल्या भागातील पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सदर भागात नळाद्वारे दुषित पाणीपुरवठा कमी पाणीपुरवठा किंवा पाणीपुरवठा न होणे अशा तक्रारी प्राप्त झाल्यास या ठिकाणी टॅकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. सदर भागात टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्याचे सर्वस्वी जबाबदारी ही ऑपरेटर मे. ओ.सी.डब्ल्यु.पी.एल. कंपनीचे आहे व त्यांच्याद्वारे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

परंतु शहरातील बाहय भागात जेथे अद्याप जलवाहिनीचे जाळे टाकण्यात आलेले नाही. उदाहरणार्थ :-

धरमपेठ झोन अंतर्गत दाभा, वाडी, हजारी पहाड, चिंतामनी नगर.

हनुमाननगर झोन अंतर्गत चिंतेश्वर झोपडपट्टी, माँ भगवतीनगर, मेहरबाबा नगर, वैष्णवमाता नगर, श्रीकृष्ण नगर, अभिजीतनगर, दौलतनगर, तांडेकर लेआऊट, मंगलदिपनगर, मुद्रानगर, कैकाडेनगर झोपडपट्टी, महापुष्प नगर.

नेहरुनगर झोन अंतर्गत जयजलाराम नगर, भवानीनगर सोसायटी, श्रीरामनगर झोपडपट्टी, शिवछत्रपती सोसायटी, नागपूर सोसायटी, शिवम सोसायटी, नराने लेआऊट.

सतरंजीपुरा झोन अंतर्गत मौजा कळमना व वांजरा.

लकडगंज झोन अंतर्गत विजयनगर, नवकन्यानगर, धरमनगर, भोलेनगर, अंतुजीनगर, अब्बुमियानगर, तुलसीनगर, दुर्गानगर, भरतवाडा लेआऊट इत्यादी.

आशीनगर झोन अंतर्गत वांजरा वस्ती, मुरलीधर सोसायटी, समतानगर, रंजना सोसायटी, रोहीणी सोसायटी, धम्मदिपनगर, पाहूणे लेआऊट, एकतानगर, भीमवाडी, शिवनगर इत्यादी.

या भागात जलवाहिनींचे जाळे टाकण्याचे काम अमृत योजनेअंतर्गत प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे नागपूर सुधार प्रन्यासतर्फे बांधण्यात आलेल्या नारा, वांजरा व कळमना ही जलकुंभ कार्यान्वीत करण्यात येणार आहे. सदर काम पुर्ण झाल्यानंतर या भागातील नागरिकांना भविष्यात नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येईल व आवश्यकतेनुसार टँकर्सची संख्या कमी करण्यात येईल. परंतु सदर काम पुर्ण होईस्तोवर शहरातील विविध भागातील नागरिकांना टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी म.न.पा.ची आहे. त्याचप्रमाणे शहर सुध्दा झपाटयाने वाढत असल्याने नव्याने जलवाहिनी नसलेल्या भागात सुध्दा वाढ होत आहे, व याप्रमाणे भविष्यात सुध्दा अशा जलवाहीन्या नसलेल्या वस्त्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तथापि अशा जलवाहिनी नसलेल्या भागात आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास व त्यावर GPRS प्रणाली लावण्यास मान्यता देण्यास विनंती आहे.

**वि.क्र.१०२ :-**
{**जलप्रदाय विभाग**}

नागपूर शहरात राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासन व राज्य शासन पुरस्कृत 'अमृत' प्रकल्पाअंतर्गत एकूण ४२ उंचीवरील जलकुंभ (ESR) व ०१ जमिनीवरील जलकुंभ (GSR) अशा एकूण ४३ जलकुंभाचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या २८५.६२ कोटी (प्रकल्प राशी २२६ कोटी + २०% + ५% कंसलटंसी चार्जेस) किंमतीवर मे. वॉप्कोस लि. या

कंपनीस प्रकल्प राबविण्याकरिता महानगरपालिकेच्या महासभेद्वारे ठराव क्र. २०१ दि. २०.०३.२०१८ अन्वये मंजुरी देण्यात आली.

तद्नंतर दि. २९.०६.२०१८ रोजी म.न.पा. आयुक्त यांचेसोबत झालेल्या वाटाघाटामध्ये मे. वॉप्कोस लि. यांनी कंसलटंसीचे दर ५% वरून ३%पर्यंत कमी केले. यानुसार मे. वॉप्कोस यांचेकडून प्रस्तावाची सुधारित किंमत २८०.१८ कोटी (एकूण प्रकल्पाची किंमत २७२.०२ + ३% कंसलटंसी चार्जेस) यास महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. १६९ दि. ०९.०७.२०१८ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदर प्रकल्प ऑगस्ट २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. सदरबाबत या प्रकल्पाचे कंत्राटदार मे. वॉप्कोस लि. यांना विचारणा करण्यात आली असता, जलकुंभाचे बांधकाम करावयाच्या जागेबाबत विविध विभागाचे ना हरकत पत्र प्राप्त असलेल्या जागेपैकी फक्त १७ जागेवरच जलकुंभाचे व संलग्न जलवाहिण्याचे काम करणे शक्य असल्याबाबत त्यांनी कळविले आहे. त्या अनुषंगाने १७ जलकुंभ व संलग्न जलवाहिण्याचे काम मे. वॉप्कोस लि. यांचे मार्फत करणे व १६ जलकुंभाचे काम महानगरपालिकेमार्फत करावयाचे प्रस्तावित आहे. उर्वरित १० जलकुंभाचे काम तांत्रिक अडचणी व जागेअभावी करता येणार नाही.

उक्तप्रमाणे संपूर्ण प्रकल्पाच्या रू. २७२.०२ कोटी खर्चास मंजुरी प्राप्त असुन उक्त बाब लक्षात घेता खालीलप्रमाणे सुधारित प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

१.मे. वाप्कोस लि. यांचे मार्फत १७ ESR मुख्य जलवाहिन्या व वितरण जलवाहीण्याचे कामास येणारा सुधारित रू. १६५.०० कोटी खर्चास मान्यता प्रदान करणे.

२. महानगरपालिके मार्फत १६ ESR व मुख्य जलवाहिन्याचे कामास येणारा सुधारित रू. ६८.८४ कोटी खर्चास मान्यता प्रदान करणे.

३. वरिल १ व २ नुसार येणाऱ्या एकूण रू. २३३.८४ कोटी खर्चास मान्यता प्रदान करणे.

४. शिल्लक राशी (२७२.०२-२३३.८४) रू. ३८.१८ कोटी, महानगरपालिकेच्या प्रस्तावित रोहणा येथून कच्चे पाणी उचल करणे या प्रकल्पाकरिता खर्च करण्यास मान्यता प्रदान करणे.

टिप:-

१. १. सदर प्रकल्पाकरिता मंजुर राशी - २७२.०२ कोटी.

२. २. वरिल १ व २ प्रमाणे या कामास होणारा खर्च - २३३.८४ कोटी.

३. शिल्लक राशी (२७२.०२-२३३.८४) रू. ३८.१८ कोटी, रोहणा येथून कच्चे पाणी उचल करण्याच्या महानगरपालिकेच्या प्रस्तावित प्रकल्पाकरिता खर्च करण्यात येईल.

४. वरिलप्रमाणे मंजुरी प्राप्त झाल्यावर प्रस्ताव शासनाचे मंजुरीस्तव पाठविण्यात येईल.

५. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

**<u>वि.क्र.१०३</u> :-** दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
**{समाजकल्याण विभाग}** शहरी बेघर निवारा या उपांगा अंतर्गत नगरपरिषद प्रशासन संचालनालय ,मुंबई यांच्या मार्फत सन २०१८- १९या आर्थिक वर्षी ३शहरी बेघर निवारा नुतनीकरण करण्याबाबतचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते .त्यानुषंगाने नामदेव विक्रमजी लाडे हिंदी उच्च प्राथमिक शाळापरिसर ,मोहन नगर ,नागपूर इमारत शहरी बेघर निवारा नवीन बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे .

| अनु . .क्र | शहरी बेघर निवाऱ्याकरिता नवीन बांधकाम करण्यात येणाऱ्या जागेचा नाव व पत्ता | निवारा उपलब्ध करून देणाऱ्या लाभार्थ्यांचा तपशील | लाभार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | नामदेव विक्रमजी लाडे हिंदी उच्च प्राथमिक शाळा परिसरनागपूर ,मोहन नगर , | पुरुष महिला / | पुरुष १०० -<br>महिला ५० - |

सदर प्रस्तावास नूतनीकरण करणेबाबत मनपा स्थगित सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र .२८० दि . २४/०९/२०१८ अन्वये एकमताने मान्यता प्रदान करण्यात आली होती .तसेच Structural Auditorच्या अहवालान्वये सदर जागेचे नूतनीकरण करण्याऐवजी बांधकाम Dismantleकरण्याचे नमूद आहे .त्यानुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचालनालय ,मुंबई यांना प्रस्ताव पाठविले असता नवीन बांधकामाचा मनपाच्या सर्वसाधारण सभेचा ठराव पाठविण्याबाबतचे कळविण्यात आले आहे .

उपरोक्त निवाऱ्याचा नवीन बांधकामाचा O& Mचा खर्च DAY- NULMअभियाना अंतर्गत करण्यात येईल .नवीन बांधकामाचे काम पूर्ण झाल्यानंतर निवाऱ्याचे देखभाल व व्यवस्थापनेसाठी पहिले पाच वर्षापर्यंत अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अनूदेय देखभाल व्यवस्थापन निधी उपलब्धते प्रमाणे DAY- NULM अभियाना मार्फत देण्यात येईल .त्यानंतर पुढील कालावधीसाठी देखभाल व्यवस्थापन खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेनी करावयाचे आहे .त्यानुषंगाने DAY- NULMअभियाना अंतर्गत एक शहरी बेघर निवाऱ्याचे नविन बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर प्रस्तुत.
टिप -:सविस्तर माहिती नस्ती संलग्न

**(मा. सदस्यांनी दि. २०-०३-२०२० रोजी भरणाऱ्या सभेकरिता सादर केलेले नोटीस)**

**नोटीस क्रमांक ७५ :-**
**(आस्थापना विभाग)**
**(मा. श्री. संदीप प्रल्हाद सहारे)**

नागपूर महानगरपालिकेचा ठराव क्र. ३८९ दिनांक २०-०६-२०१९ नुसार सहाय्यक आयुक्त/वार्ड अधिकारी (अ.ज.)-१ पदाकरिता जाहिरात क्र. ५२०/पीआर, दिनांक १७-०१-२०१८ नुसार जाहिरात देण्यात आलेली होती. या जाहिरातीनुसार २४ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. अर्ज पडताळणी ६ उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरले. उर्वरित १८ उमेदवारांची लेखी परीक्षा महाऑनलाईन व्दारे दिनांक ०६-१०-२०१८ ला घेण्यात गुणानुक्रमांकानुसार ५ उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरिता दिनांक ०८-०२-२०१९ रोजी बोलविण्यात येऊन निवड समितीव्दारे प्रत्यक्ष मुलाखत घेऊन लेखी व मुलाखतीचा निकाल महानगरपालिकेच्या वेबसाईटवर दि. ०८-०२-२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला. या मुलाखतीच्या यादीनुसार प्रथम क्र. श्री. घनश्याम पंधरे यांचे नाव असून व्दितीय क्रमांकावर श्री. योगेश गेडाम यांचे नाव आहे. श्री. योगेश गेडाम यांना प्रतिक्षा यादीत ठेवून श्री. घनश्याम पंधरे यांना नियुक्ती देणे अनिवार्य असतांना आज एक वर्षाचा कालावधी लोटला असतांना सुध्दा नियुक्ती न दिल्यामुळे होत असलेल्या अनियमिततेच्या संदर्भाने.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ७६ :-**
**(आरोग्य विभाग)**
**(मा. ॲड धर्मपाल मेश्राम)**

मनपा झोन क्र. १ ते ५ हया झोन अंतर्गत कचरा संकलन करणारी, ए.जी. एनव्हायरो कंपनीची कार्य, त्यांनी केलेला अनुबंध, त्यातील नियमावली, त्यातील कलमे व त्याचे अनुपालन व संदर्भातील अनियमितता संबंधी चर्चा करणे.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ७७ :-**
**(आरोग्य विभाग (एस))**
**(मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)**

नागपूर महानगरपालिकेतील ऐवजदार सफाई कामगारांना सेवेत नियमित करण्यात आले नियमित करण्याच्या आदेशात अटी व शर्तीतील अट क्र. १८ मध्ये लाड पागे समितीच्या शिफारशी अंर्तगत वारसा हक्काबाबतच्या कुठलाही लाभ मिळणार नाही असा उल्लेख आहे लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या नियुक्तीच्या बाबतीत चर्चा उपस्थित करणे व निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ७८ :-**
**(आरोग्य विभाग (एस))**
**(मा. श्री. तानाजी सुकलाजी वनवे)**

नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत शहरातील विविध प्रभागात मोठया प्रमाणात इमारतीच्या बांधकामाचे काम सुरु असून या बांधकामाकरिता लागणारे साहित्य रस्त्यांच्या दुतर्फा ठेवत असल्यामुळे रहदारीस अडथळा होत असते. हे साहित्य ठेवण्याकरिता बांधकाम करणाऱ्यांनी महानगरपालिकेची परवानगी घेतली आहे किंवा नाही? तसेच बांधकामानंतर उरलेल्या साहित्यांचा तसेच सी.एन.डी. (C.N.D.)

मटेरियल उचलण्याबाबत व ताबडतोब विल्हेवाट लावून रस्ता मोकळा करण्यास होत असलेल्या अनियमिततेच्या संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ७९ :-**
**(आरोग्य विभाग (एम))**
**(मा. श्री. तानाजी सुकलाजी वनवे)**

सध्या संपूर्ण जगामध्ये जवळपास ९४ राष्ट्रांमध्ये कोरोना वायरसने थैमान घातले असून लक्षावधी जनता या कोरोना वायरसमुळे पिडीत असून हजारोंच्या संख्येंनी नागरीकांचा मृत्यु झला आहे. या कोरोना वायरस महामारीवर नागपूर महानगरपालिकेने काय उपाय योजना केली आहे या संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ८० :-**
**(स्थावर विभाग)**
**(मा. सौ. आशा उईके)**

गांधीबाग झोन क्र. ६ अंतर्गत प्रभाग क्र. ८ मध्ये नागपूर महानगरपालिकेचे यंग मुस्लिम फुटबॉलचे मैदान असून सदर मैदान यंग मुस्लिम फुटबॉल क्लबकरिता महानगरपालिकेने लिजवर दिलेले आहे काय? ही बाब खरी आहे का? किंवा कसे? खरी असल्यास सार्वजनिक वापराचे मैदान कोणत्या नियमानुसार देण्यात आले असून या मैदानाची देखरेखीचे काम क्लब कडून करण्यात येते का? किंवा महानगरपालिका करते. उदा. इलेक्ट्रीक बिल, सामाजिक कार्यक्रमाकरिता या मैदानाचे शुल्क महानगरपालिका किंवा क्लब घेत आहे. तसेच मैदानात गैर वाजवी बांधकामाच्या अनियमिततेच्या चौकशी संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ८१ :-**
**(स्लम विभाग)**
**(मा. ॲड॰ धर्मपाल मेश्राम)**

सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० हया तीन आर्थिक वर्षात रमाई घरकुल योजनेत महाराष्ट्र शासनाकडुन किती रक्कम प्राप्त झली? त्यापैकी किती रक्कम नेमकी खर्च झली? त्याचप्रमाणे किती लाभार्थ्यांना हया प्रत्येकी आर्थिक वर्षात हया योजनेचा लाभ मिळाला? व किती लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर होऊन रक्कमेकरिता प्रलंबित आहेत? हया संबंधी चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**(मा. सदस्यांनी दि. २०-०६-२०२० रोजी भरणाऱ्या सभेकरिता सादर केलेले नोटीस)**

**नोटीस क्रमांक ८६ :-**
**(लोककर्म विभाग)**
**(मा. तानाजी वनवे)**

सन २०२० चा पावसाळा सुरु होत असून नागपूर महानगरपालिकेच्या सिमा क्षेत्रात असलेल्या प्रत्येक प्रभागातील पावसाळी नाल्या व सिवर लाईनचे तससेच नागपूर शहरातुन वाहणाऱ्या नदयांची पुर्णत- साफ सफाई करण्यात आली आहे का? तसेच सिवर लाईनच्या टाक्याची स्थिती सुनिश्चित करुन त्या टाक्यावर तुटलेली झाकणे बदलविण्यात आली आहे का? व पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरिता पावसाळी नालीचे टाके व त्यवरील झाकणांची स्थिती सुनिश्चित करण्यात आले आहे का? या संदर्भाने चर्चा करण्यशबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ८७ :-**
**(अधि. अभि.सा.आ.अभियांत्रिकी विभाग)**
**(मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)**

नागपूर शहरातील गडर लाईनचे चोकेज दुरुस्त करण्यासाठी नव्याने निर्माण केलेल्या सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागामार्फत केल्या जात आहे मात्र या विभागाच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी हे मनपाच्या विविध विभागाच्या असल्याने त्यामध्ये ससन्वय निर्माण होत नाही. त्यामुळे उद्भवणाऱ्या प्रश्नाबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ८८ :-**
**(घनकचरा व्यवस्थापन विभाग)**
**(मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)**

नागपूर शहरातील मान्सुनपुर्व नाले सफाईसाठी मागील वर्षीच्या तुलनेत कमी खर्चात नाले सफाई करण्यात आली. दरवर्षी नाले सफाईची कोणती पद्धती होती व त्यामुळे अधिकचा पैसा खर्च होत होता. त्यामुळे मनपाचे इतक्या वर्षापासुन झालेल आर्थिक नुकससान व त्यासाठी जबाबदार अधिकारी याबाबत माहिती जाणुन घेणे व या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ८९ :-**
**(कर विभाग)**
**(मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)**

कोरोना संक्रमणामुळे निर्माण झालेल्या सामाजिक व आर्थिक स्थितीमुळे मागील आर्थिक वर्षातील मालमत्ता कर, पानी कर व मनपाचे विविध देयके भरण्यास नागरीकांना विलंब होत असल्यामुळे त्यावर आकारण्यात येणारे वार्षिक २४% व्याजाची रक्कम माफ करण्यासंबंधी विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ९० :-**
**(घनकचरा व्यवस्थापन विभाग)**
**(मा. श्री. किशोर दामोदर जिचकार)**

कोरोना व्हायरस संचार बंदीमुळे नागपूर रेल्वे स्टेशन जवळपास पुर्णत: महिन्याभरापासुन बंद असून रेल्वे रुळावरिल घुशी व उंदरांचा प्रार्दुभाव मोठया प्रमाणात वसाहतीत झाल्याने नागरिक त्रस्त आहेत. करीता रेल्वे स्टेशन परिसरात उंदर व घुशीवर प्रतिबंध तसेच उपाय योजना करण्याच्या हेतू संदर्भाने चर्चा करण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ९१ :-**
**(सामान्य प्रशासन विभाग)**
**(मा.श्री. प्रवीण दटके)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 51 अन्वये अन्य महानगरपालिका अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची संख्या पदनामे श्रेणी इ. याबाबत पोटकलम (1) ते पोट कलम (5) पर्यंत विहीत केलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 52 स्थायी अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीवर निर्बंध याबाबत या कलमात नेमणुकीवर निर्बंधाच्या बाबतीत स्पष्टता केली आहे आणखी असे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 53 नेमणूकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे या बाबत पोटकलम (1) ते (3) पर्यंत स्पष्टता केली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 54 मध्ये नेमणूका करण्याची रित स्पष्ट केली आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियम 51, 52, 53 आणि 54 मध्ये स्पष्टता दिली असतांना महानगरपालिकेच्या प्रत्येक सक्षम प्राधिकारणीचा अधिकार स्पष्ट केला असतांना कायदयाचे उल्लंघन करून तात्पूरत्या स्वरूपाच्या किंवा अतिरिक्त कार्यभार दिलेल्या नियुक्ती आयुक्ताव्दारे

करण्यात आलेल्या आहेत. त्या नियमाप्रमाणे आहेत काय? व कोणत्याही विषिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अषी मान्यता घेण्याची आयुक्त, म.न.पा. यांना आवष्यकता वाटली नाही काय? याबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याबाबत.."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ९२ :-**
**(उद्यान विभाग)**
**(मा.श्री. प्रवीण दटके)**

आर्थिक वर्ष 2019–20 मध्ये स्थायी समिती व्दारे वृक्षारोपण कामाकरिता 10 कोटीची वृक्ष लावण्याचे काम मंजूर केले होते. परंतु आजपर्यंत हे वृक्षारोपणाचे कार्य विभागाव्दारे पूर्ण केले नाही. पर्यावरणाच्या दृष्टीने नागपूर शहराला हरित शहर बनविण्याचा या नागपूर महानगरपालिकेचा मानस होता. परंतु विभागाच्या हलगर्जीपणामुळे या धोरणाला हळताळ फासला त्यामुळे उपरोक्त काम विहीत कालावधीत पूर्ण झाले किंवा नाही. याबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याबाबत.."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ९३ :-**
**(आरोग्य विभाग (एम))**
**(मा.श्री. प्रवीण दटके)**

कोविड–19 मध्ये विविध दवाखान्याची सुस्थिती व दुरुस्ती प्रशासनाव्दारे हाती घेण्यात आली होती. यामध्ये इंदिरा गांधी रुग्णालयाच्या सुस्थिती व दुरुस्तीची कामे हाती घेऊन एकाच कामाचे दोन वेगवेगळे प्राकलन तयार करुन वेगवेगळी मंजुरी प्रदान करण्यात आली. हे खरे आहे का? व नागपूर महानगरपालिकेच्या अंतर्गत येत असलेल्या रुग्णालयात सुस्थितीकरण व दुरुस्ती करण्यासाठी प्रशासनाने बँक डेट मध्ये तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे का? असल्यास प्रशासनाने असे नियमाच्या विरुद्ध काम का केले, याची कारणमिमांसा करावी. याबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याबाबत.."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ९४ :-**
**(आरोग्य विभाग (एम))**
**(मा.श्री. प्रवीण दटके)**

नागपूर महानगरपालिकेने कोविड–19 अंतर्गत तयार केलेल्या विविध विलगीकरण केंद्राच्या बाबतीत तससेच विलगीकरण करुन ठेवण्यात आलेले नागरिक व तेथील व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याबाबत.."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**नोटीस क्रमांक ९५:-**
**(अतिक्रमण विभाग)**
**(मा. तानाजी वनवे)**

नागपूर शहरातील पावसाळा सुरु होण्यापुर्वी सिमा क्षेत्रातील किती अतिक्रमण विभागाकडुन हटविण्यात आलेले आहेत. तसेच संपूर्ण शहरातील विविध नद्यांच्या परिसरात असलेले अतिक्रमण बाबतची स्थिती काय आहे. यावर महानगरपालिकेकडुन कोण कोणत्या प्रकारची कारवाई केलेले आहे. तसेच व्यावससायिकांनी आपल्या व्यवसायाच्या जागेत केलेल्या अतिक्रमणवर महानगरपालिकेने काम कारवाई केली. या संदर्भात चर्चा करण्यासाठी निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

---------------------------